# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०७/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

दिनांक २२/०७/२०२४ रोजी पोस्टे पारशिवनी येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, पारशिवनी हद्दीतील मौजा घोगरा टी पॉईट पेंच रोड येथे पॅशन प्रो मोसा क्र. एम एच– ४९/ए– ०९४६ ने दारूची अवैध वाहतुक होत आहे. अशा माहिती वरून मोसा क्र. एम एच– ४९/ए– ०९४६ ने अवैद्यरीत्या दारू वाहतुक करणाऱ्या दोन इसमांना नाकाबंदी केली असता **आरोपी नामे– १) शिशुपाल कवडुजी चव्हान वय ३९ वर्ष २) सुनिल दौलतराव गिरी वय ३९ वर्ष दोन्ही रा. पिपळा त. पारशिवनी** यांच्या ताब्यातून विनापरवाना व अवैधरीत्या १) देशी दारू भिगंरी संत्रा १ च्या ४८ नग निपा प्रत्येकी १८० एम एल एकुण ८६४० एम एल कि. ३३६० रू २) पॅशन प्रो मोसा क्र. एम एच ४९/ए ०९४६ कि. ३००००/– रू असा एकुण ३३,३६०/– रू चा मुद्देमाल मिळुन आला.

सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोउपनि शिवाजी भताने पो.स्टे. पारशिवनी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे पारशिवनी येथे कलम ६५ (अ), ८३ मदाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे पारशिवनी येथील ठाणेदार पोनि. राजेशकुमार थोरात, पोउपनि शिवाजी भताने, पोशि पृथ्वीराज चव्हान, राकेश बंधाटे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर